॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार २०२६ करीता सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिलेल्या व्यक्ती किंवा संस्था पैकी एकास पुरस्कार देण्याकरीता दि. ९ मे २०२६ पर्यंत पुरस्कारांचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार देण्याकरीता इच्छूक व्यक्ती / संस्था यांचे कार्य पुढील प्रमाणे असावेत. अ) रचनात्मक आणि समाजबांधणी करणारे कार्य आवश्यक आहे. ब) वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सामाजिक प्रबोधन वाढीस लावणारे कार्य असावे. क) आरोग्य, साक्षरता, महिला व बालकल्याण, व्यसनमुक्ती आदी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य समाजासाठी उन्नत करणारे व पथदर्शक असावे. त्या परिवेशाची सामाजिक नाळ ही बहिणाबाई चौधरी यांच्या तत्त्वज्ञानाशी निगडीत असावी. या पुरस्काराची विस्तृत माहिती, अर्जाचे नमुने विद्यापीठाच्या nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार यांच्या नावे पुरस्कार देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या घेतला असून हा पुरस्कार शिक्षण / सामाजिक / कृषि / साहित्य या चार क्षेत्रापैकी एका क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या एक व्यक्ती किंवा एका संस्थेला दरवर्षी एका क्षेत्रा करीता पुरस्कार देण्यात येतो. तरी इच्छूक व्यक्ती / संस्था यांनी दि. ९ मे २०२६ पर्यंत पुरस्काराचे प्रस्ताव कुलसचिव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या पत्त्यावर बंद पाकिटात पाठवावेत असे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले आहे.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ७ एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता